महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक : एमआयएस-०१२२/प्र.क्र.२०/२०२२/३१ दिनांक - २७ मार्च, २०२४

## - : **प्रसिद्धीपत्रक**:-

**विषय :-** लिपिक टंकलेखक व कर सहायक संवर्गाच्या टंकलेखन कौशल्य चाचणीसाठी पात्र ठरणा-या उमेदवारांच्या प्रमाणाबाबत.

महाराष्ट्र गट-क सेवा मुख्य परीक्षा २०२३ या स्पर्धा परीक्षेमधुन भरावयाच्या लिपिक टंकलेखक व कर सहायक या संवर्गाच्या टंकलेखन कौशल्य चाचणीसाठी पात्र ठरणा-या उमेदवारांचे प्रमाण १:३ वरुन १:५ करण्याबाबत आयोगाकडे मोठ्या प्रमाणात उमेदवारांची अभिवेदने प्राप्त झाली/होत आहेत. या संदर्भात उमेदवारांना अवगत करण्यात येते की, आयोगामार्फत प्रस्तुत संवर्गाकरीता दिनांक १३ ऑक्टोबर, २०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या महाराष्ट्र गट-क सेवा मुख्य परीक्षा २०२३ च्या जाहिरातीमधील मुद्दा क्रमांक १०.२.५ मध्ये ‘भरावयाच्या एकूण पदांपैकी प्रत्येक आरक्षित प्रवर्ग/उपप्रवर्गासाठी सुमारे ३ पट उमेदवार टंकलेखन कौशल्य चाचणीसाठी उपलब्ध होतील, अशा रितीने गुणांची किमान सिमारेषा (cut off line) निश्चित करण्यात येईल’ अशी तरतुद आहे. सदर तरतुदीमध्ये आता मुख्य परीक्षेनंतरच्या टप्प्यावर कोणताही बदल करणे शक्य होणार नाही.

ठिकाण : नवी मुंबई

सह सचिव,
दक्षता, धोरण व संशोधन,
महाराष्ट्र लोकसेवा आयोग